**पुस्तक–परीक्षण**



# "अर्धे आकाश"– स्त्री-मुक्तीलढ्याचा प्रभावी आविष्कार

स्त्री-मुक्ती लढ्याची लाट देशात तुफान वेगाने उसळत आहे. या लढ्याने आता चांगलेच मूळ धरले आहे. देशात आमूलाग्र सामाजिक स्थित्यंतरे होण्याच्या काळात हा लढा उभा राहात आहे. म्हणूनच हुंडा, बलात्कार, यामुळे होणाऱ्या आत्यंतिक छळातून मुक्त होण्याकरता वरच्या वर्गातील पांढरपेशा स्त्रियांपासून अगदी कष्ट करून पोट भरणाऱ्या स्त्रियासुद्धा धैर्याने पुढे येत आहेत. उपेक्षित ग्रामीण महिला रोजगारासाठी, महागाईविरुद्ध मोर्चे काढीत आहेत, निदर्शने करीत आहेत. इतकेच काय जमिनदारी अत्याचारांविरुद्ध अगदी तळागाळातील स्त्रिया हजारोंच्या संख्येने जमिन-दारांचे गुंड, पोलीस यांच्याशी मिळेल त्या शस्त्रांनिशी प्रत्यक्ष झुंज देत असल्याच्या बातम्या वर्तमानपत्रांतून झळकत आहेत.

या चळवळीचा आणखी एक पैलू या काळात पहायला मिळाला. या वर्षाचा ८ मार्चचा महिला दिन हा न्यूट्रॉन बॉंबविरोधी व युद्धविरोधी जागतिक शांतता दिन म्हणून श्रमिक महिला समिती, अखिल भारतीय महिला फेडरेशनतर्फे साजरा करण्यात आला. झोपडपट्ट्यांतून अत्यंत मागासलेल्या निरक्षर स्त्रियांच्यामध्ये गटसभा घेऊन येणाऱ्या युद्धाच्या धोक्याची कल्पना देण्यात आली. मानवसंहार करणाऱ्या अस्त्रांची प्रथमच स्त्रियांना इत्यंभूत माहिती देण्यात आली. परिणामी हजारोंच्या संख्येने झोपडपट्टीतील गरीब स्त्रियांनी अमे-रिकन कल्चरल सेंटरवर न्यूट्रॉन बॉंबविरोधी निदर्शने केली. अशा पार्श्वभूमीवर "अर्धे आकाश" हे [illegible] या संस्थेचे लढाऊ पथनाट्य जागृती व अचूक [illegible] दर्शनाच्या दृष्टीने महत्वाची कामगिरी बजावीत आहे.

**कथानक**–शांताचे वडील दाजीबा मळा गहाण ठेवून कर्ज काढून मुलीचे लग्न करतात. सासरा पुराणमत-वादी संस्कारांचा मूर्तिमंत प्रतिनिधी. 'स्त्रिया जु रोज मानायां सर्वं तद्वोचते कुलम. आणि यत्र नार्यस्तु पूज्यते रमंते तत्र देवता: व कुल देवताभ्यो नम:' चा जप करीत असतो. पण शांता सडासंमार्जन करीत असताना अंगावर शितोडा उडाल्याबरोबर तिचा उद्धार करतो की श्वान, शूद्र व स्त्री नरकयोनी असते. दीर सरंजामी संस्कारांचा पुतळा. त्याचा जप 'रांधा, वाढा उष्टी काढा' हे आईबापांनी शिकवले नाही तर लग्न कशाला करून दिले ?'

तो शांताला जळत्या लाकडाने मारतो. नवऱ्याकडे ती तक्रार करते तेव्हा लग्नात सासऱ्याने स्कूटर देण्याचे कबूल केले होते याची आठवण करून देऊन पायातली वहाण पायात ठेवण्याचा सल्ला देतो. नवरा एकूण पुरुषी व भांडवलशाही संस्कारांचा बळी. बायको म्हणजे मालकीची उपभोग्य वस्तू व सासऱ्याकडून पैसे उकळ-ण्याचे साधन. शांताला मारझोड होते, उपाशी ठेवण्यात येते. ती माहेरी पत्र लिहीते. दीर ते काढून घेतो. सास-ऱ्याच्या तक्रारी चव्हाटयावर मांडून घराण्याची अब्रू धुळीला मिळविणारी म्हणून तिला घरातून हाकलून काढण्यात येते. बाप दिल्या घरी तू सुखी रहा' म्हणून

दरवाजा बंद करतो. शांता रस्त्यावर पडते. पण डगमगत नाही. शेतमजूर म्हणून काम करते. तिथे जमिनदारी अत्याचार तिच्या अनुभवास येतो. ती खाणीत मजूर म्हणून काम करते. समान वेतन, बाळंतपणाची रजा, पाळणा घर इत्यादी मागण्यांसाठी संप होतो. तिला कामावरून संपात भाग घेतल्याबद्दल काढून टाकण्यात येते.

संपात पोलिसांचा लाठीहल्ला होतो. पण मागण्या मान्य होऊन शांताला कामावर घेतले जाते. शांता म्हणते, 'आजवर माझ्यावर अनेक अन्याय झाले. पण फक्त कामगारवर्गच आमच्यावर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध झगडला.' या लढ्यात सरकार व भांडवलदार वर्गाचे स्वरूप तिला कळून येते. आपण सामाजिक अन्यायाविरूद्ध झगडायचे हा प्रश्न तिच्या मनात घर करून बसतो. कामगारांचा लढा केवळ आर्थिक मागण्यांसाठी नसून शोषण–मुक्तीचा लढा आहे हे तिला अनेक निदर्शनांतून कळते आणि एकूण शोषण–मुक्तीच्या लढ्यात स्त्री–मुक्तीचा मार्ग तिला स्पष्ट दिसतो.

**आविष्कार –** या कथानकाचा आविष्कार अत्यंत कलात्मक रीतीने करण्यात आला आहे. एकजण मंगलाष्टक म्हणतो, 'कन्या ही ठरते विवाहसमयी आपत्ती मोठी खरी'...येथे सर्व जळोनी खाक शुचिता माणुसकीही मरे।' सप्तपदीच्या वेळी जी घोषवाक्ये होतात त्यातून स्त्री ही अबला म्हणून जन्मास येत नसून संस्कारांनी तिला अबला कसे बनविले जाते याचे मार्मिक दिग्दर्शन होते. बालपणी वडिलांच्या, तरुणपणी पतीच्या, म्हातारपणी मुलाच्या आज्ञेत राहाण्याची तिला दीक्षा देण्यात येते. स्त्रीशिक्षण म्हणजे चवचालपणा ही कल्पना. सासर व माहेर बंद झाल्यानंतर शांता विचारते, "आग चहू बाजूंनी लागली संसारा। सवालाचा जबाब दोरे जागराच्या प्रेक्षका। कष्ट छळ सोसूनी सासरी राबले। माहेराची राख करुनी काय मी मिळविले। जन्मभर शोषणाचा पुजावा का देव्हारा? रूढीच्या बेड्या घालूनी आमुच्या पायात। धर्माच्या नावानं जीव आमुचा काढतात। किती काळ छळ हा सहन आम्ही करावा ?" हे गाणे ऐकताना प्रेक्षक हेलावून जातो. माहेरी जाताना रस्त्यातली एक मिरवणूक पहाते. "हर जोरजुलूमकी टक्कर में, संघर्ष हमारा नारा है;" ही तिच्या मनावर पडलेली पहिली ठिणगी असते. संपात आघाडीवर राहून ती लाठीहल्ला सहन करते. लढ्यांतून खऱ्याखुऱ्या स्त्रीमुक्तीचा मार्ग सापडल्यानंतर ती शेवटचे गाणे म्हणते. "घेऊन डोक्यात जुन्या कल्पना फसलो आम्ही आजवरी। चल आणि मूल हीच भावना वाळगली ग आम्ही उरी। अर्धे आकाश जागवायला मुक्ती झेंडा घ्या हाती।" तिसऱ्या जगातील स्वातंत्र्याचा लढा वर्णन करताना ती म्हणते,

काखेत मूल पाठीवर बंदूक संभाळली आपुली शेती।
एकजुटीने टाकले गाडून साम्राज्यवादी राक्षस किती ?
दिले जगाला आदर्श घालूनी स्त्री मुक्तीला दिली गती।
अर्धे आकाश जागवायला मुक्ती झेंडा घ्या हाती।"

अरुंधती चौधरी ही ग्रामीण स्त्री हे नाटक पाहिल्यावर म्हणते, "हे नाटक नव्हते, माझेच सगळे आयुष्य होते. पण करायचं काय हे कळत नव्हते ते चांगले कळले. तुम्ही सगळ्या स्त्रियांना हे नाटक दाखवा."

**–तारा बळंजू**



(ज्यांना हे नाटक करावयाचे असेल त्यांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

जागर : शहा बिल्डिंग, ३/५, भगत गल्ली,
माहीम, मुंबई ४०००१६)